# MAHESH TUTORIALS I.C.S.E.

**ICSE X** **Marks :** 80

SUBJECT : **MARATHI**

**Exam No. :** MT/ICSE/PRELIM-I-SET A-002 **Time :** 3 hrs.

**Model Answer Paper**

## SECTION A

**A.1** Write a short composition in **Marathi** of approximately **250** words on any **one** of the following topics :

खाली दिलेल्या विषयापैकी कोणत्याही **एका** विषयावर सुमारे **250** शब्दांचा **मराठीत** संक्षिप्त निबंध लिहा.

(i) **मुद्दे :** मानवी जीवनात ग्रंथाना महत्त्वाचे स्थान - माणसाचे वर्तमानकालीन जीवन हे भूतकाळ व भविष्यकाळ यांच्याशी जोडलेले - भूतकाळात डोकावायला व भविष्याची स्वप्ने रंगवायला ग्रंथ शिकवतात. ग्रंथ धरणासारखे असतात मागील ज्ञान त्यात साठवलेले असते.

इलेक्ट्रॉनिक माध्यमांमुळे वाचन मंदावले व ग्रंथालये ओस पडली. सध्याचे युग स्पर्धात्मक व धकाधकीचे माणसाच्या डोळ्याला माणूस दिसत नाही - सतत धावाधाव - घड्याळ्याच्या काट्यावर जीवन - शांतपणे वाचनाचा रसास्वाद घ्यावा, आनंदामृत प्यावे अशी उसंत नाही.

एकविसाव्या शतकात दूरचित्रवाणी, संगणक, इंटरनेट यांच्या जमान्यात ग्रंथालयाचा विसर - वाचनाची आवड अस्तंगत - वाचन, मनन, चिंतन ही प्रक्रिया दूर - वाचनप्रियतेवर आक्रमण.

गावात ग्रंथालये सांस्कृतिक केंद्रे बनावीत - गावातील विचारवंत, कलावंतांचे सांस्कृतिक कार्यक्रम व्हावेत - गावाबाहेरील विचारवंत, लेखक, कवी यांना बोलावून ज्ञानाचा फायदा करून घ्यावा. वाचनाची अशी गोडी लावावी.

ग्रंथालयाचे बदलत्या काळानुसार रूप पालटावे - पुस्तकांबरोबर संगणक, सीडी, कॅसेटस उपलब्ध व्हावे. ग्रंथ म्हणजे ज्ञानाला निमंत्रण, आकाशाला गवसणी घालणारे विमान, ज्ञानसागराची सैर करणारी नौका ! वाचनाच्या आलयात अर्थात घरात मन रमावे, ज्ञानामृत पिऊन तृप्त व्हावे, संपन्न व्हावे. [15]

(ii) **मुद्दे :** विद्यालय - विद्येचे आलय - घर - ज्ञानाचे मंदिर - विद्यार्थ्याने विद्या प्राप्त करून सर्वगुणसंपन्न व्हावे - ज्ञान, संस्कार, शिस्त अंगी यावी.

पूर्वीच्या काळी - पंतोजी - छडीचा प्रसाद - घोकंपट्टीवर भर - प्रसंगी - फटके - कडक शिस्त - दबाव, दरारा, जरब - तावून, सुलाखून निघणे - तोंडपाठ करणे - आज पाढे पाठ करण्यापेक्षा कॅल्क्युलेटरवर आकडेमोड - आजही जुनी पिढी तोंडावर हिशेब - पावकी, अडचकी, पाढे पाठांतर अनेक श्लोक, कविता, भाषणे पाठांतर.

नवीन शैक्षणिक धोरण - क्षमताधिष्ठित अभ्यासक्रम - मूल्यमापन परीक्षापद्धती - परीक्षेतील गुणांना महत्त्व - स्पर्धा - चढाओढ - अभ्यासाव्यतिरिक्त इतर कलागुणांना वाव - विद्यार्थ्यांच्या क्षमता - कल असलेल्या विषयाचे ज्ञान - खेळ, क्रीडा, कला, साहित्य, आणि विज्ञान, तंत्रज्ञान अनेकविध शाखा निवडण्याचे - विषयांचा अभ्यास करण्याची मुभा - डोक्यावर अतिरिक्त भार न देण्याकडे कल - शिक्षक - छडीचा वापर नाही - संस्कार, स्वयंशिस्त भय नाही - परीक्षा पद्धती बदलली - सोप्यात सोपे करून पर्यायी प्रश्नांना महत्त्व आले.

मनात पुढील पिढीबद्दल भीती - तळमळ, आस्था, भीती निघून जाईल का ? मेहनतीची सवय कधी लागायची ? स्वतंत्रतेचे दुष्परिणाम भोगावे लागतील का ? सुखासिनतेमुळे - ऱ्हास न होवो - विद्यार्थ्यांना ज्ञानोपासना अखंड लाभो, संस्कार, ज्ञान देणारे, कानउघडणी करणारेही शिक्षक लाभोत - विद्यार्थी सर्वगुण संपन्न होवोत ही ईश्वरचरणी प्रार्थना. [15]

(iii) **मुद्दे :** पहाटे उठण्याची सवय - शांत वातावरण, सूर्योदयाआधीचा अंधुक प्रकाश - थंड हवा- मन तजेलदार, ताजेतवाने - विद्यार्थ्यांसाठी अभ्यासाला योग्य वेळ - फिरण्यास योग्य वेळ - दरवर्षी प्रतिज्ञा - पहाटे उठायचे - मोडली जाते. सकाळच्या वेळी मऊमऊ रजईत, उबदार गोधडीत शिरून झोपण्याचा मोह - मधुर स्वप्नात झोपेचे सुख सोडवत नाही - रात्री जागरण चालेल पण सकाळी उठताना पाच मिनिटे झोपू दे असा जप संपत नाही.

एकदा लवकर उठण्याची प्रतिज्ञा - घरच्यांचे कौतुक - पहाटे मोठ्या कष्टाने उठणे - निरनिराळ्या मोबाइल, घड्याळात गजर लावून शेवटी उठणे - बिचाऱ्या आईला त्रास - लवकर उठून गरम गरम चहा घेऊन अभ्यासाला सुरुवात - एखादे पान वाचून होते न होते तोच निद्राराणीचे हळूच आगमन - झोपेचा अंमल सुरू - दिवसभर व रात्री उशिरापर्यंत काम करून थकलेली आई मात्र जागी - माझ्यासाठी चहा, कॉफी तयार करून देण्यासाठी तिची धडपड - पण शेवटी झोपेने विजय मिळवणे - मी हार मानणे - प्रतिज्ञा भंग - आजोबांचा उपदेश आठवणे - 'लवकर निजे, लवकर उठे । तया आरोग्य ज्ञान संपत्ती भेटे ।।' - शेवटी निर्णय जाहीर - यावर्षी १ जानेवारीपासून शपथपूर्वक लवकर उठण्याची प्रतिज्ञा - लगेच पांघरुणात गुडूप - सध्या वेळ आहे तोवर झोपूया - नंतरचे नंतर पाहू ! घुर्र ऽऽ घुर्रऽऽ **[15]**

(iv) **मुद्दे :** आजकाल विभक्त कुटुंबपद्धतीची फॅशन- पण आमच्याकडे मात्र एकत्र कुटुंब पद्धती - आजी घरची कर्ती स्त्री - वय साधारण ६५ ते ६८ दरम्यान पण जोश, उत्साह ताकद मात्र तरुणांनाही लाजवणारा - सर्वांना एका सूत्रात बांधणारी - नातवंडांवर करडी नजर पण जिवापलीकडे जपणारी - स्वतःही कर्तृत्ववान स्त्री - उच्च पदावरून कार्यनिवृत्त - कडक शिस्त - प्रेमळ वागणे यांचे मिश्रण - अभ्यासात मदत - गोष्टी सांगणे - जुन्या नव्याचा - संगम चांगल्या सवयी लागणे - आजचे माझे कर्तृत्व - आजीला श्रेय - मनात आदर - नतमस्तक - सगळ्यांना अशी आजी लाभो, प्रेम लाभो - प्रार्थना. **[15]**

(v) **मुद्दे :** आनंदी, एकत्र कुटुंबाचे चित्र - एकजुटीत ताकद मोठी असते - असे हे आनंदी, सशक्त कुटुंब दिसते - माणूस सामाजिक प्राणी - परिवार, कुटुंब, समाज मिळूनमिसळून राहतो. सरकार - लोकसंख्या नियंत्रणासाठी छोटे कुटुंब, सुखी कुटुंब हा संदेश - घराला घरपण त्याच्या सदस्यांनी येते. प्रेमाची घट्ट वीण सगळ्यांना बांधून ठेवते.

''घर असावे घरासारखे
नकोत नुसत्या भिंती ।'' असे म्हणतात ते खोटे नाही. एकजुटीतच मोठी शक्ती असते. घरातील वडिलधाऱ्यांचे उपदेश, सल्ले बरोबर घेऊन, त्याला नाविन्याची जोड देऊनच माणूस पुढे जाईल तर सर्वच सुखी - कधी रागे भरणे, कधी शाबासकी, कधी सांत्वन तर कधी उत्तेजन - हे सारे भाव घरात मिसळलेले.

''एकमेंका साह्य करु, अवघे धरु सुपंथ ।'' **[15]**

**A.2** Write a letter in Marathi of approximately **120** words on any one of the topics given below :

खालील दिलेल्या विषयांपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे **120** शब्दांपर्यंतचे एक पत्र **मराठीत** लिहा :

(i) अ.ब.क.
११५,नवी पेठ,
कोल्हापूर.
दि. ३ जानेवारी, २०१६

ती. सौ.आईस,
सा.न.वि.वि.

तुझे पत्र कालच मिळाले. वाचून खूप आनंद झाला.आमच्या शाळेत कालच नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी पुष्प प्रदर्शन भरले होते. त्याचेच वर्णन करण्यासाठी मी हे पत्र लिहित आहे.

आई, अगं किती वेगवेगळ्या प्रकारची फुले होती ! आमच्या शाळेचे सभागृह अगदी फुलांनी गच्च भरले होते.वेगवेगळे आकार, वेगवेगळे रंग, छान सुगंध. तिथे फिरताना खूप मज्जा वाटत होती.फुलांच्या इतक्या विविध जाती पाहून तर आम्ही सगळे आश्चर्यचकितच झालो.अगदी कधीही न पाहिलेल्या निळया,काळ्या रंगांची देखील फुले होती या प्रदर्शनात ! हा एक वेगळाच अनुभव होता. सभागृहातून बाहेर पडावेसे वाटतच नव्हते.

तुलाही हे सर्व वाचून आनंद झाला असेल, कारण तुलाही फुले आवडतात.बरं आता थांबते. पण आई, खुशालीचे पत्र पाठवत रहा. ती. बाबांना माझा सा.नमस्कार व छोट्या सोनूला अनेक आशीर्वाद.

तुझी मुलगी,
अ.ब.क.

प्रति,
सौ. सुषमा माथूर
ए-५, इंद्रनील सोसायटी,
शिवाजीपार्क, दादर - २८. **[7]**

(ii) प्रति,
मा. आरोग्याधिकारी,
आरोग्य विभाग,
महानगर पालिका,
मुलुंड (प), मुंबई - ८०.
दि. १० डिसेंबर, २०१६.

विषय : <u>शाळेसमोरील वाढत्या खाद्यपदार्थ विक्रेत्यांविषयी तक्रार</u>

माननीय महोदय,
सप्रेम नमस्कार.

मी अ. ब. क. आनंद विद्यालयाचा विद्यार्थी- प्रतिनिधी आहे. एका अत्यंत आवश्यक कारणासाठी मी आपले लक्ष वेधून घेऊ इच्छित आहे.

आमच्या विद्यालयासमोर खाद्यपदार्थ विक्रेत्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. शाळा भरण्याच्या, मधल्यासुट्टीच्या व शाळा सुटण्याच्यावेळी विद्यालयातील बरीच मुले हे पदार्थ खातात. पण हे पदार्थ उघड्यावर असतात, तसेच निकृष्ठ दर्जाचे असतात हे आमच्या पाहणीत आले आहे. गाड्यांवरील उघड्या पदार्थांवर माशा घोंघावत असतात. थोड्या पाण्यात भांडी साफ केली जातात. तेथेच कचरा पडलेला असतो. हे खाद्यपदार्थ खाऊन काही मुले आजारी पडली आहेत. विद्यालयातील अधिकाऱ्यांनी या विक्रेत्यांना समजवण्याचा प्रयत्न केला पण काही उपयोग झाला नाही. हे जर वेळीच थांबवले नाही तर रोगराई पसरण्यास वेळ लागणार नाही.

कृपया पत्र मिळताच आपण त्यावर यथायोग्य कारवाई कराल अशी आमची अपेक्षा आहे.

तसदीबद्दल क्षमस्व.

आपला कृपाभिलाषी,
अ.ब.क.

विद्यार्थी प्रतिनिधी,
आनंद विद्यालय,
म. गांधी मार्ग,
मुलुंड (प), मुंबई - ८०. **[7]**

| | | |
|---|---|---|
| **A.3** | Read the passage given below and answer in Marathi the questions that follow, using your own words as far as possible :<br>खालील उतारा काळजीपूर्वक वाचा आणि त्यावर आधारलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या स्वतःच्या शब्दांत लिहा : - | |
| (i) | अनाथाश्रमातून घरी आणलेल्या मुलीला 'स्पेशल पाहुणी' म्हटले आहे. अनाथाश्रमातून आणलेली मुलगी म्हणजे अर्थातच तिला घर, आई वडील कोणी नव्हते. ती अनाथ होती. घरपण, प्रेम या गोष्टी तिने अनुभवल्या नव्हत्या. ती यासाठी नवखी होती. परक्यांच्या घरात जाणे, त्यांचे घर, कुटुंब पाहून ती लहान मुलगी बुजत होती. | **[2]** |
| (ii) | 'दिवाळी दिव्यांचा सण आहे. घरात पणत्या लावून आपण झगमगाट करतो. आनंद व्यक्त करतो. आपण इतरांच्या जीवनातही प्रकाश आणून त्यांना आनंद देऊ शकतो. अनाथ मुलीला काही काळ का होईना लेखिकेच्या आईने आनंदाचा प्रकाश दिला. तिला घराचे, कुटुंबाचे प्रेम लाभले म्हणून त्यावर्षीची दिवाळी आगळीवेगळी होती. | **[2]** |
| (iii) | त्या मुलीने ताई व दादाला एक मोरपिस व सुकलेले गुलाबाचे फूल दिले. आपल्याकडे जे आहे ते इतरांना द्यावे. इतरांच्या प्रेमाची परतफेड प्रेमाने करावी हे आपण त्या मुलीकडून शिकायला मिळते. प्रेम घ्यावे व प्रेम द्यावे हे गुण दिसतात. | **[2]** |
| (iv) | साधारण सहा वर्षांनी लेखिकेकडे एक आमंत्रणपत्रिका व पत्र आले. त्या मुलीने तिच्या जीवनप्रवासाविषयी एक पुस्तक लिहिले होते. ते तिने आईला अर्पण केले होते. अनाथ मुलीला आईचे प्रेम दिल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली होती. नाती फक्त रक्ताचीच असतात असे नव्हे तर प्रेमाचे नाते, किंबहुना अशा नात्याचे प्रेम अधिक घट्ट असू शकते. | **[2]** |
| (v) | विद्यार्थ्यांनी आपला अनुभव लिहावा. | **[2]** |
| **A.4** | Answer the following according to the instructions given :<br>खाली दर्शविल्याप्रमाणे प्रश्नांची उत्तरे लिहा : | |
| (अ) | **समानार्थी शब्द लिहा. (कोणतेही दोन)** | |
| | (१) कर्ज - ऋण | **[½]** |
| | (२) घरटे - कोटं, खोपा, घर | **[½]** |
| | (३) डहाळी - फांदी | **[½]** |
| | (४) धूळ - रज, माती | **[½]** |
| (आ) | **विरुद्धार्थी शब्द लिहा. (कोणतेही दोन)** | |
| | (१) वार्धक्य × तारुण्य | **[½]** |
| | (२) सुस्त × चपळ | **[½]** |
| | (३) नफा × तोटा | **[½]** |
| | (४) अनाथ × सनाथ | **[½]** |
| (इ) | **खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा :(कोणतेही दोन)** | |
| | (१) **तरबेज असणे** - हुशार असणे. | |
| | **वाक्य** - माझे बाबा गणित विषयात <u>**तरबेज आहेत.**</u> | **[1]** |

(२) **टकळी चालू असणे** - सतत बडबड करणे.

**वाक्य** - माझ्या छोटया बहिणीची मी शाळेतून आल्यावर दिवसभर **टकळी चालू असते.** [1]

(३) **उलटतपासणी करणे** - सखोल चौकशी करणे.

**वाक्य** - चोराला पकडून पोलिसांनी त्याची **उलटतपासणी केली.** [1]

(ई) **खालील म्हणींचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. (कोणतेही दोन)**

(१) पै दक्षिणा लक्ष प्रदक्षिणा - द्यायचे थोडे पण त्याबदल्यात काम मात्र खूप करुन घ्यायचे.

वाक्य - आजकाल 'पै दक्षिणा लक्ष प्रदक्षिणा' याच पद्धतीने जगात मालक लोक वागतात [1]

(२) वासरात लंगडी गाय शहाणी - अडाणी लोकात अर्धवट शहाण्यालाही मोठेपण लाभते.

वाक्य - वर्गात सगळे नापास झाले पण सोनम मात्र काठावर पास झाली व ती भाव खाऊ लागली. तेव्हा शिक्षक म्हणाले, वासरात लंगडी गाय शहाणी. [1]

(३) घर पाहावे बांधून लग्न पाहावे करुन - अनुभवाने मनुष्य शहाणा होतो.

वाक्य - ''या देशाचा कारभार मी एकटाही सांभाळेन !'' विजय गर्वाने मित्रांना म्हणाला. सगळे हसले. म्हणाले, अरे बाबा, 'घर पाहावे बांधून लग्न पाहावे करुन' आधी आपले घर सांभाळून बघ, मग देशाचा विचार कर. [1]

(उ) **खालील प्रश्नांची सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)**

(१) पाचशे रुपये ही काही लहान रक्कम नव्हे. [1]

(२) त्याचे अक्षर अतिशय सुंदर आहे. [1]

(३) निलेशचा अभ्यास झाला नव्हता का? [1]

## SECTION - B (40 Marks)

## कथाकुंज

**A.5** Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :

खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा.

**'शाळा'**

(i) दिनू व हामजा यांनी मास्तरांनी गणिताचा दिलेला गृहपाठ केला नव्हता. आता आपल्याला छडया खाव्या लागणार असे लक्षात आल्यावर त्यांनी बराचवेळ विचार केला व शाळेत न जाण्याचे ठरवले. हामजाने घरी चहाडी न करण्याबाबत आबासला ताकीद दिली.

| | | |
|---|---|---|
| | तिघेही गुपचूप ओढयावर गेले. तरवड, घाणेरी चिंच, करंज या झाडांच्या दाटीमधून वाहणारा पांढरा-शुभ्र ओढा आणि त्याचा खळखळाट मुलांनी ऐकला. झाडांचे वास हुंगले. बराच काळ ओढयात हुंदडले. आता पुढे मजा करायला जायचे होते. हातात पाटी-पुस्तके काय कामाची ? हमजाने त्यावर उपाय सांगितला. आपली पाटी-पुस्तके वाळूत पुरून ठेवायचे ठरवले. दिनूने मग भसाभसा वाळू उकरून एक छोटासा खड्डा तयार केला. त्यात सर्वांची पाटया-पुस्तके पुरली. वर वाळूचा ढीग करुन त्यावर खुणेचा दगड ठेवला. अशाप्रकारे त्यांनी निसर्गाचा आनंद घेण्यास, हुंदडण्यासाठी, निसर्गाच्या शाळेत जाण्याची तयारी केली. | [2] |
| (ii) | लहान मुले निरागस, अल्लड असतात. पण प्रसंगी ती हुशारही असतात. दिनू, हामजा आणि आबास शाळेत जायला निघाली होती. तेवढयात दिनूला आठवले की, आपण मास्तरांनी दिलेली गणिते सोडवली नाहीत. हमजाने सोयिस्कर उत्तर शोधले की अब्बाने त्याला म्हैस राखायला पाठवल्यामुळे गणिते सोडवली नाहीत. दिनूला तर वाटले आता मला मास्तरांच्या छडया खाव्या लागणार. लहानग्या आबासचा तर एलफंडीत असल्याने गणित विषयाशी संबंधच नव्हता.<br>मग काहीवेळ तिघांनी विचार केला आणि मास्तरांचा मार चुकवण्यासाठी 'आपण शाळेत जाऊयाच नको !' असा निर्णय घेतला. सर्वांनाच ही कल्पना पसंत पडली. मग हमजाने घरी चहाडी न करण्याबाबत आबासला ताकीद दिली. आणि ते गुपचुप ओढयावर गेले. | [2] |
| (iii) | शाळा बुडवून मुले ओढयाजवळ खेळली. मासे पकडले पण लवकरच मुलांना या खेळाचा कंटाळा आला. हामजा म्हणाला आपण काटेवनात जाऊया व्हल्यांची अंडी काढायला ! अनवाणी पायांनी ते तिघे काटेवनात शिरले. त्या तिघांच्यात हामजा हाच माहीतगार होता. त्याने दिनूला व्हल्याच्या आणि रानचिमणीच्या घरटयांतील वेगळेपणा समजावून दिला. रानचिमणी कशी ओळखायची हे सांगितले. हामजाने आबासला साधा व्हला आणि पठाणी व्हला यांच्यातील फरक समजावला. आबासने पठाणी व्हल्याची दोन अंडी खमिसाच्या खिशात ठेवली. मग ते काटेवनातून हिंडले. व्हल्या-पारंब्यांची कोटी शोधत, खारीच्या मागे धावत, बाभळीवरचा पांढरा-पिवळा डिंक गोळा करत फिरले. देवबाभळ, रामकाठी यातील फरक जाणून घेतला.<br>त्या जंगलातून अनेक नवीन गोष्टी दिनूने पाहिल्या. सुरेख पक्षी, पांढरे उंदीर, हिरव्या पंखाचे झगमगीत सोनकिडे. ते धरुन काडयापेटीत ठेवायचे आणि बाभळीचा पाला खाऊ घालायचा म्हणजे ते अंडी घालतात. नेपतीची तांबडीलाल फळे, कोळीश्राची विलक्षण कोटी, मधाची पोळी. अशी कितीतरी गोष्टी दिनूने पाहिल्या. अशाप्रकारे मुलांना काटेवनात पक्षी व झाडे यांची नवनवीन माहिती मिळाली. | [3] |
| (iv) | पाटी-पुस्तक अभ्यासण्याच्या शाळेत न जाता दिनू, हामजा व आबास ही मुले निसर्गाच्या शाळेत गेली. ओढयावर खेळली, दिवसभर काटेवनात हुंदडली. सूर्य कलल्यावर काटेवनातील पाखरे गोंधळ करु लागली. तेव्हा अंधार पडायच्या आत मुले घरी जायला निघाली. भूक लागल्याने डिंक खाऊन त्यांची तोंडे चिकट झाली होती. पुरून ठेवलेली पाटी-पुस्तके काढून तिघेही आपल्या घरी गेले.<br>उन्हात हिंडल्याने दिनूचे तोंड तांबडेलाल झाले होते. आईला वाटले शाळेत मास्तरांनी खूप खेळवलेले दिसते. दिनू चालत चालत शरीराने घरी आला होता पण मन मात्र काटेवनातल्या विलक्षण वातावरणातच तरंगत होते. निसर्ग सानिध्याच्या धुंदीतून तो अजून बाहेर आला नव्हता. मनातल्या मनात पायाने पाणी उडवीत होता. मासे पकडीत होता. व्हल्याची कोटी काढीत होता. डिंक गोळा करीत होता.<br>निसर्ग हा सर्वात मोठा गुरु आहे. त्याच्या सानिध्यात जो आनंद मिळतो तो इतरत्र नाही. दिनूची अशी भारावल्यासारखी अवस्था झाली होती. | [3] |

**A.6** Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :

खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा.

**'वेग'**

(i) जगमोहन तसा कॉलेजच्या दुसऱ्या वर्षाला होता. पण शिक्षणात तसा त्याला रस नव्हता. नावाला कॉलेजमध्ये जात होता त्यामुळे परीक्षेत पास होईल अशी खात्री नव्हती. घरच्या परिस्थितीमुळे, पैशांची ओढाताण बघून साहजिकच त्याला लवकर पैसे कमवावे व परिस्थिती बदलावी असे त्याला वाटत असावे.

त्याच बरोबर चालून आलेली नोकरीची संधी सोडून देणे त्याला योग्य वाटले नाही. म्हणून जगमोहनने कॉलेज सोडण्याचा विचार केला आणि टॉय शॉपमध्ये सेल्समन म्हणून नोकरी धरली.

लेखकाने त्याला ग्रॅज्युएट होण्याबद्दल सांगितल्यावर तो म्हणाला, शेवटी नोकरी ही करायचीच ना? मग चार वर्षे फुकट घालवायची, काकांचे पैसे घालवायचे त्यापेक्षा पैसे कमावणे हे चांगले.

पुढे वर्षभराने जगमोहन पुन्हा लेखकाला रस्त्यात भेटला. त्यावेळी तो स्कुटरवर होता. त्यांना पाहताच स्कुटर थांबवून म्हणाला, जरी सेकंडहँड स्कुटर असली तरी स्पीड चांगला आहे. येण्याजाण्यासाठी काहीतरी वाहन हवेच. उगाच बसच्या रांगेत कोण ताटकळत थांबणार ? म्हणजे बससाठी उभे राहून वेळ घालविण्यासारखेच आहे.

या वर्षभरात जगमोहनमध्ये बराच फरक जाणवत होता. साहजिकच आहे. स्वतः कमवायला लागला होता. हाती बऱ्यापैकी पैसा येत असावा. घरात फक्त आई आणि व्याजाच्या पैशांवर अवलंबून रहावे न लागता परिस्थिती बदलली होती. पूर्वीचा साधेसे कपडे घालून वावरणारा जगमोहन आता एकदम मोठा पुरुष वाटत होता. अंगात जीन्स-जॅकेट घालून, मिशा ठेवून आधुनिक वाटत होता लेखकानी त्याचे एकदा टाय शॉप बघायला येईन असे सांगताच तो म्हणाला, ''आणखी थोड्या दिवसांनी या मग तुम्हाला खरच माझं टॉय शॉप बघायला मिळेल!''

याचाच अर्थ जगमोहन घरात हातभार लावण्यासाठी पैसे कमावणे, तुटपुंज्या पगारावर समाधान मानणे, इतरांची चाकरी करण्यात समाधान मानणारा नव्हता. एकच वर्ष नोकरी करुन सर्व सिस्टीम जाणून घेऊन कर्ज काढून स्वतःचे टॉय शॉप उभारणारा, गतीने जीवनात पुढे जाणाऱ्या जगमोहनकडे पाहताच लेखक बुचकळ्यात पडले. **[2]**

(ii) घरची आर्थिक परिस्थिती, शिक्षणाविषयी उदासिनता, झटपट पैसा कमवण्याची धडपड या गोष्टीने माणूस शिक्षणापासून दूर होत जातो. जगमोहनचे वडील अचानक हृदयविकाराचा झटका येऊन तरुण वयातच वारले होते. आई आणि जगमोहन खेतवाडीत रहायचे. प्रॉव्हिडंट फंडाचे व्याज आणि आईची पार्टटाइम नोकरी यातून दोघांचे कसेतरी भागे. वेळप्रसंगी काकांची मदत घेऊन संसाराची गाडी पुढे ढकलावी लागे. जगमोहन तसा कॉलेजच्या दुसऱ्या वर्षाला होता. पण शिक्षणात तसा त्याला रस नव्हता. नावाला कॉलेजमध्ये जात होता त्यामुळे परीक्षेत पास होईल अशी खात्री नव्हती. घरच्या परिस्थितीमुळे, पैशांची ओढाताण बघून साहजिकच त्याला लवकर पैसे कमवावे व परिस्थिती बदलावी असे त्याला वाटत असावे.

शेवटी शिकायचे ते कशासाठी ? नोकरी करण्यासाठी, पैसा कमावण्यासाठीच ना ? मग शिक्षणात आवड नसताना, पास होण्याची खात्री नसताना उगाच चार वर्षे फुकट का घालवावी ? काका जरी प्रेमाने करत असले तरीही त्यांच्या जीवावर किती रहावे ? त्याच बरोबर चालून आलेली नोकरीची संधी सोडून देणे त्याला योग्य वाटले नाही. म्हणून जगमोहनने कॉलेज सोडण्याचा विचार केला आणि टॉय शॉपमध्ये सेल्समन म्हणून नोकरी धरली. **[2]**

(iii) जगमोहन तसा कॉलेजच्या दुसऱ्या वर्षाला होता. पण शिक्षणात तसा त्याला रस नव्हता. त्याच बरोबर चालून आलेली नोकरीची संधी सोडून देणे त्याला योग्य वाटले नाही. म्हणून जगमोहनने कॉलेज सोडण्याचा विचार केला आणि टॉय शॉपमध्ये सेल्समन म्हणून नोकरी धरली. या वर्षभरात जगमोहनमध्ये बराच फरक जाणवत होता. साहजिकच आहे. स्वतः कमवायला लागला होता. हाती बऱ्यापैकी पैसा येत असावा.

लेखकानी त्याला एकदा टाय शॉप बघायला येईन असे सांगताच तो म्हणाला, ''आणखी थोड्या दिवसांनी या मग तुम्हाला खरच माझं टॉय शॉप बघायला मिळेल!'' एकच वर्ष नोकरी करुन सर्व सिस्टीम जाणून घेऊन कर्ज काढून स्वत:चे टॉय शॉप उभारणारा, गतीने जीवनात पुढे जाणाऱ्या जगमोहनकडे पाहताच लेखक बुचकळ्यात पडले.

आणखी दोन महिन्यांनी जगमोहनकडून 'जेम टॉईज्' च्या उद्घाटनाचे लेखकाला कार्ड आले. दुकानात शोविन्डोज, आरसे, दुकानाच्या नावाची उंच पाटी, फुटपाथवर फुलझाडे असे मांडून जगमोहनने दुकान छान सजवले होते. शेजारी एक खेळण्याचे दुकान होते, त्या दुकानाची जगमोहनला स्पर्धा वाटत नसून फायदाच वाटे. त्याच्या दुकानात अधिक फिनिश, जास्त वेग असणाऱ्या इंपोर्टेड कार्स, जीप्स आणि मोटर सायकली ठेवल्या होत्या.

गाड्या मॅन्युफॅक्चर करणाऱ्या स्वाडिश कंपनीचा अधिकारी आधीचे त्याचे टॉय शॉप बघायला आला होता. त्याला जगमोहनने आपली थिअरी, पुढे जाण्याची जिद्द, आत्मविश्वास सांगितला. प्रत्येक लहान मुलाला मोठे व्हायची घाई असते. त्याला फास्ट कार्स आवडतात! एका जागी उभी राहणारी खेळणी त्याला नको असतात. हे जगमोहनचे मुलांविषयी निरीक्षण ऐकून प्रचंड प्रभावित (इम्प्रेस) झाला. तिथून कॅटलॉग पाठवून त्याच्या प्रॉडक्टस् संबंधी त्यांचा पत्रव्यवहार सुरू झाला. स्वत: कडचे सगळे पैसे ओतून त्याने शेजारचे दुकान विकत घेऊन मूळ दुकानाला जोडले. 'जेम्स टॉईज्' प्रशस्त, एअरकंडिशन बनवले.

जगमोहनला साचेबंदपणा, एका जागी फार काळ स्थिरावून राहणेच- पसंत नव्हते. सतत गती, पुढे पळणे, श्रीमंत - अति श्रीमंत व्हायचे होते; तेही जलद गतीने - थोडक्या काळात ! म्हणूनच स्वत:शीच नकळत जीवघेणी स्पर्धा करत होता तो. [3]

(iv) वरुण हा जगमोहनचा अवघा चौदा वर्षांचा मुलगा. वडिलांचेच हाडपेर घेऊन जन्माला आलेला आणि त्यांच्याही पेक्षा अधिक वेगाने जगणारा होता. किंबहूना वेगाची नशाच झाली होती त्याला. जे वडिलांच्या कडून पाहून शिकला त्याच्याही पुढचे पाऊल म्हणजे वरुण होता. 'बापसे बेटा सवाई' असे म्हणणेच योग्य होते. गाडी चालवण्याचे लायसन्स नसतानाही वडिलांचा डोळा चुकवून सुसाट गाडी पळवत असे.

खेळण्यांच्या प्रदर्शनात लेखक जगमोहनकडे गेले होते. तेथे वरुण आला. वडिलांची रीतसर परवानगी घेऊन गाडी मागण्यासाठी. नो स्पीडिंग अशी कौतुकाने ताकीद देऊन जगमोहनने परवानगी दिली. पोलिसांना पकडता येऊ नये म्हणून मी गाडी वेगाने चालवतो अशी सबब सांगून वरुण तेथून सटकला.

वेगाचे फार वेड असलेल्या वरुणने रात्री दोनच्या सुमारास मरीन ड्राइव्हवर प्रचंड वेगाने मारूती चालवत असताना थांबलेल्या ट्रकवर जाऊन आदळली आणि जागच्या जागी ठार झाला. ती बातमी लेखकाला संध्याकाळी दूरदर्शनवरील बातम्यांमध्ये ऐकायला मिळाली आणि लेखक लगोलग जगमोहनच्या अंधेरीच्या नवीन बंगल्यावर भेटायला गेले. लेखक पोहोचे पर्यंत सारे काही आटोपले होते. लोक घरोघरी परतले होते. बंगल्यामध्ये अंगावर काटा आणणारी शांतता होती. हॉलमध्ये वरुणच्या छायाचित्राची मोठी तसबीर होती. त्यावर हार चढवले होते. समोर दिवा जळत होता.

जगमोहन स्वत:ला सावरण्याचा प्रयत्न करत होता पण त्याचे दोषी मन त्याला खात होते. मुले नेहमी आपल्या आईबापांचे अनुकरण करतात. तेव्हा आईवडिलांनीच वागण्यात सावधानता बाळगायला हवी. मुले चुकत असतील, धोक्याच्या मार्गाने जात असतील तर वेळीच पायात खीळ घालायला हवी. योग्य-अयोग्य गोष्टींची समज द्यायला हवी. पण वेगाचे हे वेड वरुणला जगमोहननेच लावले होते. लवकर पुढे जाण्याच्या घाईत बाप आपले कर्तव्य विसरला. मुलाचे टोकाला गेलेले वेगाचे वेड कौतुकाने इतरांना सांगत राहिला. त्याला अडवले नाही. वडिलांच्याही पुढे जायचे होते, अधिक वेग हवा होता वरुणला. या वेगाच्या वेडाने व योग्य मार्गदर्शनाच्या अभावी वरुणचा बळी घेतला होता. ''विनाशकाले विपरीत बुद्धी -'' याप्रमाणे आज जगमोहनला पश्चात्ताप होत होता. एकुलत्या एका मुलाच्या वियोगाने तो स्फुंदू लागला. [3]

**A.7** Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :

खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :

**'पुण्य'**

(i) मानव आश्रम हा अनाथ मुलांचा आश्रम होता. तीस-चाळीस वर्षांचे किसनभाऊ म्हणजे दादा हे संस्थेचे सर्व काम पाहायचे. मानव संस्था तशी नवी होती. सरकार तर्फे तिला अनुदान मिळत नव्हते. लोकांनी दिलेल्या मदतीतूनच तीस चाळीस अनाथ मुलांचे शिक्षण व संगोपन केले जात होते. अन्नधान्य व पैशांची नेहमीच चणचण असे. आश्रमात पंचपक्वान्नांचे जेवण मिळण्याचे ठराविक दिवस असत. सणावारी मुलांची चंगळ असे. वेगवेगळ्या सेवाभावी संस्था फराळ द्यायला यायच्या. संस्थांचे पदाधिकारी मुलांसोबत फोटो काढून वृत्तपत्रात प्रसिद्ध करायचे. मुलांशी गोड बोलून त्यांना खाऊ घालायचे.

दिवाळीचे दिवस होते. त्यादिवशी मुले भरपेट जेवून सुस्त झाली होती. दुपारी चार वाजून गेल्यावर हिरालाल आणि त्यांचे भाऊ माणिकलाल हातात भल्यामोठ्या पिशव्या घेऊन आले. ते सुरतहून आश्रमात आले होते. त्यांच्या वडिलांचे म्हणजे चंपकभाईचे नाशिक मध्ये क्रियाकर्म करुन झाल्यावर ते आश्रमात अन्नदान करण्यासाठी आले होते.

चंपकभाईंना समाजकार्याची खूप आवड होती. त्यांच्यानंतर त्यांची मुले हे समाजकार्य पुढे चालू ठेवणार होती. नेहमी ज्या संस्थेत ते अन्नदान करीत तेथे जाण्यास त्यांना उशीर झाला. त्यांनी ते अन्न स्वीकारले नाही म्हणून पाच किलो गुलाबजाम आणि पाच किलो बासुंदीचे अन्नदान करण्यासाठी मानव आश्रमात हिरालाल व त्यांचे भाऊ माणिकलाल आले होते. **[2]**

(ii) मानव आश्रम हा अनाथ मुलांचा आश्रम होता. तीस-चाळीस वर्षांचे किसनभाऊ म्हणजे दादा हे संस्थेचे सर्व काम पाहायचे. मानव संस्था तशी नवी होती. लोकांनी दिलेल्या मदतीतूनच तीसचाळीस अनाथ मुलांचे शिक्षण व संगोपन केले जात होते. आश्रमात पंचपक्वान्नांचे जेवण मिळण्याचे ठराविक दिवस असत. सणावारी मुलांची चंगळ असे. वेगवेगळ्या सेवाभावी संस्था फराळ द्यायला यायच्या.

दिवाळीचे दिवस होते. त्यादिवशी मुले भरपेट जेवून सुस्त झाली होती. दुपारी चार वाजून गेल्यावर हिरालाल आणि त्यांचे भाऊ माणिकलाल हातात भल्यामोठ्या पिशव्या घेऊन आले. ते सुरतहून आश्रमात आले होते. त्यांच्या वडिलांचे म्हणजे चंपकभाईचे नाशिक मध्ये क्रियाकर्म करुन झाल्यावर ते आश्रमात अन्नदान करण्यासाठी आले होते. पाच किलो गुलाबजाम आणि पाच किलो बासुंदीचे अन्नदान करण्यासाठी मानव आश्रमात हिरालाल व त्यांचे भाऊ माणिकलाल आले होते.

त्यांनी पाच किलो गुलाबजाम आणि पाच किलो बासुंदी आणली आहे हे ऐकून दादा चक्रावले. आज दिवाळीचा दिवस असल्याने अनेक संस्थांनी अन्नदान करुन मुलांनी सकाळपासून तीन वेळा जेवण घेतले होते. शिवाय फळे, बिस्किटे, दूध वगैरे खाऊन मुले सुस्त झाली होती. मुलांच्या प्रकृतीचा विचार करुन त्यांना अधिक आग्रह करणे योग्य नव्हते. तरीही माणिकलाल ऐकायला तयार नव्हते. आम्ही चांगल्या भावना घेऊन आलो आहोत, नाही म्हणून नका. थोडे थोडे द्या.

हिरालाल आणि माणिकलाल फक्त स्वतःचाच विचार करत होते. अन्नदान करुन पुण्य कमावणे, मृत वडिलांच्या आत्म्याला शांती मिळवणे एवढाच विचार त्यांना ठाऊक होता. वडिलांचे समाजकार्य, त्यांच्या आत्म्याच्या शांती करता जिवंत, लहानग्या मुलांच्या प्रकृतीची चिंता करण्याशी जणू त्यांचा संबंधच नव्हता. नेहमीच्या संस्थेत जायला उशीर झाला व त्यांनी नाकारले म्हणून मानव संस्थेत येऊन गोड बोलून मुलांवर जणू जबरदस्ती करु पाहत होते.

दादा त्यांना परोपरीने समजावून सांगत होते. मुलांचा थोडा तरी विचार करायला हवा, आम्ही अन्न न फेकता रात्री देऊ असे समजावून सांगत होते. तरीही आपलेच घोडे पुढे दामटणाऱ्या हिरालालना 'अवघड आहे हिरालालजी' एवढे एक वाक्य निक्षून उच्चारुन दादांनी त्यांचा प्रस्ताव फेटाळून लावला. **[2]**

(iii) मानव आश्रम हा अनाथ मुलांचा आश्रम होता. लोकांनी दिलेल्या मदतीतून तीसचाळीस अनाथ मुलांचे शिक्षण व संगोपन होत असे. दिवाळीचा दिवस असल्याने अनेक संस्थांनी अन्नदान करुन मुलांनी सकाळपासून तीन वेळा जेवण घेतले होते. शिवाय फळे, बिस्किटे, दूध वगैरे खाऊन मुले सुस्त झाली होती. मुलांच्या प्रकृतीचा विचार करुन त्यांना अधिक आग्रह करणे योग्य नव्हते. पाच किलो गुलाबजाम आणि पाच किलो बासुंदीचे अन्नदान करण्यासाठी मानव आश्रमात हिरालाल व त्यांचे भाऊ माणिकलाल आले होते. दादा त्यांना परोपरीने समजावून सांगत होते. मुलांचा थोडा तरी विचार करायला हवा, आम्ही अन्न न फेकता रात्री देऊ असे समजावून सांगत होते.

दादांनी त्यांची विनंती फेटाळून लावली. जी गोष्ट विनंती, आर्जव करुन साध्य होत नाही तेथे पैशांच्या नोटा उपयोगी येतात. माणिकलालनी पाचशे रुपये देऊ केले. दादांपा पैशांचा मोह नसला तरी संस्थेला मिळणारी मदत म्हणून ते पैसे स्वीकारुन शेवटी त्यांनी तोडगा काढला. फक्त पाच मुलांना बोलावून थोडेसे खायला द्या असे सांगितले. दादांनी पाच जणांना बोलावले व हिरालालानी त्यांना खायला दिले.

माणिकलाल व हिरालाल हे भाऊ सुरतहून आले होते. त्यांचे वडील चंपकलाल देवाघरी गेले. त्यांचे नाशिकला क्रियाकर्म करुन ते दोघे आश्रमात आले होते. त्यांच्या वडिलांना समाजकार्याची खूप आवड होती. त्यांचे कार्य पुढे चालवण्यासाठी अनाथाश्रमात अन्नदान करुन पुण्य कमावण्यासाठी आले होते. वडील जसे अन्नदान करत तसेच मुलेही करत आहेत हे स्वर्गातल्या वडिलांना समजले की त्यांना आनंद होईल, त्यांच्या आत्म्याला समाधान लाभेल. त्यांच्या सारख्या गरीब माणसाच्या (व्यापारी-गरीब ?) पदरात थोडंफार पुण्य पडेल म्हणून ते दादांना विनवणी करत होते. दादांनी त्यांना निक्षून 'अवघड आहे' असे सांगितल्यावर संस्थेला दान करुन दादांचा तोडगा मान्य करुन येनकेन प्रकाराने मुलांना जेवू घातले. अन्नदानाचा कार्यक्रम पार पडला. आपला हेतू साध्य झाल्यामुळे हिरालाल आणि माणिकलाल यांनी दादांचे आभार मानले. **[3]**

(iv) माणिकलाल आणि हिरालाला यांची मुलांना अन्नदान करण्याची इच्छा होती. पण मुले सकाळपासून खाऊन सुस्त झाली होती. तरीही मुलांना थोडे थोडे खायला देऊया असे ते दोघे आर्जव करत होते.

दादांनी त्यांची विनंती फेटाळून लावली. जी गोष्ट विनंती, आर्जव करुन साध्य होत नाही तेथे पैशांच्या नोटा उपयोगी येतात. माणिकलालनी पाचशे रुपये देऊ केले. दादांना पैशांचा मोह नसला तरी संस्थेला मिळणारी मदत म्हणून ते पैसे स्वीकारुन शेवटी त्यांनी तोडगा काढला. फक्त पाच मुलांना बोलावून थोडेसे खायला द्या असे सांगितले. दादांनी पाच जणांना बोलावले व हिरालालानी त्यांना खायला दिले.

हिरालाल व माणिकलाल यांनी मुलांना आग्रहाने दोन - अडीच किलो गुलाबजाम व बासुंदी खायला लावली. मुलांची खाऊन पोटे ताणली. पाणी प्यायलाही जागा उरली नाही. मध्यरात्री अचानक त्या समळयांना उलट्या होऊ लागल्या. पोटं ताणून श्वासही घेता येत नव्हता. सुभाष डोळे पांढरे करुन घाणीतच पडला होता. पोट ताणले होते. श्वासोच्छवास मंद गतीने चालला होता.

दादांनी रिक्षातून पाचही मुलांना सरकारी दवाखान्यात नेले. उपचार सुरु झाले. अतिदक्षता विभागात मुलांना ठेवले गेले. मुलांना अतिसेवनामुळे अतीर्ण व विषबाधा झाली होती. डॉक्टरांनी सांगितले की सुभाष नावाचा मुलगा मरण पावला आणि अन्य मुलं धोक्याबाहेर होती. अशाप्रकारे कुणाच्यातरी पुण्यासाठी, आत्म्यासाठी आग्रहाला बळी पडून आश्रमावर, दादांवर व लहानग्या मुलांवर बाका प्रसंग आला.

'विनाशकाले विपरीत बुद्धि' असे म्हणतात. आयुष्यभर तटस्थपणे आपले काम इमानेइतबारे करत असताना, वेतन कमी की जास्त हा विचार न करता समाजसेवा करताना, कधीतरी मोहाचा असा हा क्षण आला. हिरालाल व माणिकलाल यांच्या वडील-स्वर्ग-आत्मा-पुण्यकार्य - अन्नदान इत्यादी शांतीसाठी केलेल्या कार्याच्या आग्रहाला दादा बळीपडले. पाचशे रुपये नजरे समोर नाचू लागले आणि हातून चूक घडली.

आपण तटस्थ, कणखर राहिलो असतो, ठामपणे त्यांना नकार दिला असता तर मी सुभाषचा जीव घेतला नसता. त्यांनी सुभाषवर नजर टाकली. मृतावस्थेतील सुभाषचा चेहरा आपल्याकडे पाहून हसतोय. त्याच्या हसण्यात भयावह असा आवाज आहे असे दादांना वाटू लागले. त्यांचे मन अपराधीपणाच्या भावनेने भरुन गेले म्हणून त्यांना तारुण्यातही वार्धक्य आले आहे असे वाटले. **[3]**

## काव्यांगण

**A.8** Read the stanza given below and answer in **Marathi** the questions that follow :

(अ) खालील पद्यांश वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :

**संतवाणी ('सुखाचें हें सुख')**

(i) आपला आनंद वर्णन करताना संत नामदेव दाखले देतात. 'चंद्र - चकोर, मेघ मयूर' यांचे दाखले देऊन आपल्या मनातील आनंद ते व्यक्त करतात. आपल्याला आनंदाचा बहार कसा आला आहे. आपले रोम रोम पुलकित झाले आहे. आपले तन, मन प्रफुल्लित झाले आहे असे ते म्हणतात. चंद्राला पाहून चकोर पक्ष्याला जसा आनंद होतो. कारण चंद्राची शीतल किरणे चकोर पक्षी पिऊन जीवन जगत असतो म्हणून आपल्याला जीवन देणाऱ्या चंद्राला पाहून चकोराला आनंद होतो. तसेच दुसरा दाखला ते मेघ व मयुराचा देतात. आकाशात काळे ढग आले की मोराला आनंद वाटतो आणि तो नृत्य करतो. आकाशातून ढगांमधून बरसणाऱ्या रिमझिम धारांनी मोराला आनंदाचा ठेवा मिळाल्यासारखे वाटते , तसाच आनंद संत नामदेवांना विठठल दर्शनाने झाला आहे असे ते म्हणतात. त्यांच्या आनंदाला उधाण आले आहे, बहार आलेला आहे. मनात तो आनंद मावत नाही. अंग प्रत्यांग जणू आनंदाने डोलत आहे. मनातून तो आनंद ओसांडत आहे.

अशाप्रकारे श्रीहरीच्या मुखचे दर्शन झाल्यावर संत नामदेवांना आत्मसुख मिळाले. **[2]**

(ii) संत नामदेव हे विठ्ठलाचे परमभक्त होते. विठ्ठलाला ते विठाई माऊली म्हणतात. ते विठ्ठलाला आईच्या रूपात पाहतात. लहान मुलाला जसे आईविना इतर जग नसते. आई जवळ असणे हे परमोच्च सुख असते तसेच नामदेवांना परमेश्वर दर्शनाचे हे परमोच्च सुख आपणास लाभले आहे असे वाटते.

विठ्ठलाच्या दर्शनाने जीवनातील परमसुखाचा लाभ आपणास झाला आहे याचे वर्णन संत नामदेव 'सुखाचे हे सुख' या अभंगात भक्तिभावाने करतात.

परमेश्वर म्हणजे जीवनातील परमोच्च सुख होय. तो सुखाचा सागर असतो. या सुखाच्या दर्शनाचे सुख संत नामदेवांना लाभले. श्रीहरिच्यामुखाचे दर्शन म्हणजे परमसुख होय. हे विठ्ठलाचे दर्शन जेव्हा नामदेवांना झाले तेव्हा त्यांना अतीव आनंद झाला आणि ते मंत्रमुग्ध झाले. तहान, भूक, ताप, दु:ख या जाणिवाच नष्ट झाल्या. जणू 'मी न माझा राहिलो' अशी तादात्म्याची, एकरूपतेची भावना निर्माण झाली. माझ्या आयुष्यातील सर्व इच्छा परिपूर्ण झाल्या. मी धन्य झालो, मनाला शांती, समाधान लाभले. **[3]**

Read the stanza given below and answer in **Marathi** the questions that follow :

(ब) खालील पद्यांश वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :

**संतवाणी ('नको देवराया')**

(i) मंगळवेढयातील श्यामा नावाच्या नर्तिकेच्या पोटी रूपगुणांची खाण जन्माला आली. अशी सर्वगुण संपन्न कान्होपात्रा विठ्ठलभक्तीत तल्लिन झालेली होती. 'खाण तशी माती' असे जरी म्हणत असले तरी कान्होपात्रात आईचे गुण नव्हते. तिने आपले मन तन विठ्ठलचरणी अर्पण केलेले होते. तिच्या सौंदर्याची वाखाणणी सगळीकडे होत असताना बेदरचा बादशहा तिच्या कीर्तीवर आकर्षित झाला. तिला आपल्या दरबारात येण्याचे बोलावणे धाडले. कान्होपात्रेने नकार देताच तिला उचलून जबरदस्तीने दरबारात हजर करण्यास सैनिक पाठवले.

जिवाची तगमग आणि असहाय्यता या वेदनेतून स्वत:चे रक्षण करण्यासाठी आपले आराध्य दैवत, आपल्या विठाईमाऊलीचा ती धावा करते.

कान्होपात्रा म्हणते, माझ्यावर संकट आले आहे. अगदी गळयापर्यंत आले आहे. हे देवराया, तू माझा अंत पाहू नको. माझे प्राण कंठाशी आले आहेत. हरिणीचे असहाय्य, गोजिरवाणे पाडस जर वाघाच्या तावडीत सापडले तर

त्याच्या जीवाची जी तडफड होईल, सुटकेसाठी ते जसे जिवाचा आकांत करेल तशी माझी ही अवस्था झाली आहे.

या संकटातून माझी सुटका तुझ्याविना कोणी करणारा या तिन्ही लोकात नाही. माझी असहय तडफड, तळमळ हे देवा तुला दिसत नाही का ? हे जननी विठाबाई, धावत ये आणि आपल्या मुलीस आपल्या कृपाछत्राच्या सावलीत घे. तुला यायला उशीर होत आहे तशी माझ्या मनातील आशा संपून मन दु:खाच्या गर्तेत जणू कोलांटया मारत खोल जात आहे. आजूबाजूला स्वार्थी जगाचा बाजार भरलेला आहे. यात माझी व्यथा कोण जाणणार ? हे देवा, माझी विटंबना थांबव. या जगातून माझी सुटका कर व मला तुझ्या चरणाशी स्थान दे, हे विठाई माऊली, या कान्होपात्रेस तुझ्या हृदयात बंद करुन ठेव.

अशा प्रकारे स्वार्थी जगातून सहिसलामत सुटका फक्त विठ्ठलच करू शकेल असा दृढ विश्वास मनात कायम ठेवून कान्होपात्रा आर्ततेने तिच्या आराध्य दैवतास साद घालते. **[2]**

(ii) मुलाला आईशिवाय या जगात कोणी जवळचे नसते. कुठे दुखले - खुपले तर आईने फुंकर मारली, पाठीवर मायेने हात फिरवला, हृदयाशी धरले तर ते दु:ख मूल विसरते. कान्होपात्रेचे सर्वस्व विठाईमाऊली आहे. अशा संकटाच्या वेळी ती कोणाला हाक मारणार ? ती म्हणते या संकटातून माझी मुक्तता करू शकेल असा त्राता मला या त्रिभुवनात तुझ्याविना कोणीच दिसत नाही. म्हणून हे आई, हे जननी विठाबाई तू धावत ये आणि आपल्या या प्रिय मुलीस तुझ्या पदरात घे. मला या संकटातून वाचव.

एवढी आर्त, व्याकुळतेने साद घालून सुद्धा विठाई धावत आली नाही, संकट पुढे पुढे येत आहे. मनाची अगतिक अवस्था झालेली आहे. मनातील आशेचा दिवा विझत चालला आहे. अशावेळी कान्होपात्राच्या हृदयातील बांध फुटतो. ती निराशेने, दु:खाने ओक्साबोक्शीं धाय मोकलून रडू लागते, आक्रंदन करू लागते.

अशाप्रकारे संत कान्होपात्रेच्या मनाची आगतिकता 'नको देवराया' या अभंगाच्या आधारे स्पष्ट केला आहे. **[3]**

**A.9** Read the stanza given below and answer in **Marathi** the questions that follow :

खालील पद्यांश वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :

**'प्रेमाचा गुलकंद'**

(i) तरुणाने ते भेट दिलेले गुलाब म्हणजे फक्त फुले नव्हती तर प्रेमात ओथंबलेल्या हृदयाच्या प्रेमगाथाच होत्या. लाल अक्षराने लिहिलेल्या पाठपोट भरलेल्या त्या गाथा प्रेमराग आळवित होत्या. तरुणाने दिलेल्या फुलांच्या नजराण्याचा तिने कधी अपमान केला नाही. ती फुले कधी अव्हेरली नाहीत. त्या प्रेमाच्या फुलांना तिने कधीही प्रत्युत्तर मात्र दिले नाही. तिने आपले मौन तेवढे कायम ठेवले.

सात महिने उलटून गेल्यावर त्याला वस्तूस्थिती कळली. जिला प्रेमदेवता मानले; प्रेमाने लाल गुलाब अर्पण केले. जणू प्रेमाने ओथंबलेले हृदय अर्पण केले, तिने काय केले ? त्या प्रेमाच्या प्रतीकाचा गुलकंद बनवला ? माझे प्रेम तिला जराही समजलेच नाही का ? अर्पण केलेले ते गुलाब व्यर्थ गेले का ? असे प्रियकराने विचारताच तिने त्याला 'माझ्यावर तुम्ही वृथा आळ घेत आहात' असे सांगितले. तेव्हा तरुणीच्या या शब्दांनी प्रियकराला क्षणात तारांगण दिसू लागले. त्याच्या मनाला धक्का बसला. **[2]**

(ii) लाल गुलाबाच्या गुलकंदाच्या औषधावर बिचारा, दिवाणा प्रेमवीर तिची आठवण काढत कसातरी जगला. जर हे प्रेमाचे औषध म्हणजे गुलकंद जर नसते तर तो बिचारा प्रेमरोगी कधीच 'खपला' असता, मेला असता.

स्वत:च्या वेडेपणावर हसावे की रडावे ? काळ हे नेहमी सर्व दु:खावर औषध असते. काळानुरुप त्याचे दु:ख थोडे कमी झाले असेल. आता तोच वेडा प्रेमवीर, प्रेमवेडया तरुणांना सल्ला देतो की, जर तुमचा प्रेमभंग झाला असेल, प्रेमांत निराशा आली असेल तर हा प्रेमाचा गुलकंद चाटुनी बघा. मनाला, हृदयाला याने शांती मिळते. हृदयाचे घाव भरुन निघतात.

असा हा स्वप्नाळू वृत्तीचा तरुण स्वत:च्याच स्वप्न जाळयात अडकतो आणि तोंडघशी पडतो. त्याच्या

| | | |
|---|---|---|
| | प्रेमव्यवहारातील हास्यास्पदता वाचता वाचता हसू तर फुटतेच पण कणव ही येते. तरुण-तरुणींनो, प्रेमाची स्वप्नं जागेपणी पहा. उगाच स्वप्नाळू राहू नका. सत्याची साथ दया आणि जीवनात पुढे चला. | [2] |
| (iii) | अति झाले आणि हिम्मत करुन आपले हृदय मनातले भाव उघडे करुन तिच्यासमोर ठेवायचे असे ठरवून तो प्रियकर आपल्या प्रिये समोर गेला. प्रियकर म्हणाला, हे प्रिये, मी तुला माझी प्रेमदेवता मानून तुझी मी आजवर पूजा बांधित आलो.<br>मी आजवर फुललेले, ताजे, टवटवीत असे गंद तुला अर्पण करत आलो ते उगाच होते का ? तुही ते अगदी मुग्धपणाने स्विकारत आलीस, माझा कधीही अपमान केला नाहीस की ती भेट नाकारली नाहीस. मग असे असताना मी काय समजू ? हे सुंदरी, माझी प्रेमतपश्चर्या सगळी फुकट गेली का ? अर्पण केलेले ते गुलाब व्यर्थ गेले का ? त्याच्या मनाची अशी व्याकुळ अवस्था झाली.<br>त्या तरुणाच्या प्रेमाशी अनभिज्ञ असलेली ती तरुणी जिच्या मनात फक्त फुले स्विकारण्या पलिकडे कसलाच भाव नसल्याने त्याला ओरडून म्हणाली, माझ्यावर उगाचच खोटा आळ घेऊ नका. तुम्ही दिलेल्या फुलांची मी एक पाकळी सुद्धा वाया घालविली नाही. तुम्ही दिलेल्या भेटीची, नजराण्याची मला जाण आहे.<br>असे ओरडून बोलून ती त्याच पावली आत निघून गेली. क्षणभरातच आतून कसलीतरी काचेची बरणी घेऊन आली. त्या तरुणाला म्हणली, बघा तुम्ही दिलेले गेंद मी वाया न घालवता या बरणीत टाकले. आणि तुमच्यासाठी इतका गुलकंद बनवला. तुम्ही दिलेल्या नजराण्याची किंमत नाही, वाया गेले असे कसे म्हणता ? त्या फुलांचे महत्त्व लक्षात घेऊन मी एकही पाकळी वाया घालविली नाही. | [3] |
| (iv) | गुलाब हे प्रेमाचे प्रतीक आहे. लाल गुलाब तर काय ? जणू धडधडते हृदयच. लाल गुलाब म्हणजे प्रेमाने भरलेले हृदयच जणू ! अशी ही लाल गुलाबाची फुले बाजारातून कुठून तरी त्या तरुणाने रोज आणून नियमाने तिला म्हणजे त्या तरुणीला देण्याचा जणू नियमच केला. अगदी न चुकता ती गुलाब पुष्पे आणून तो आपल्या प्रेमदेवतला मुकपणे देत असे.<br>मौनात, मुग्धपणातच तिचा होकार दडलेला आहे, मौनात खोलवर प्रितच दडलेली आहे. लाजेमुळे प्रितीचे शब्द तिच्या ओठांवर येत नसावेत. तिचे मौन म्हणजे होकार आहे असे त्यास वाटत होते. मग त्याने सुद्धा तिच्यासारखेच अबोल राहण्याचे ठरविले. आपणही आपल्या मनातले प्रेम का बरे व्यक्त करावे. या भावना मनात आहेत हेच बरे. | [3] |
| **A.10** | Read the stanza given below and answer in **Marathi** the questions that follow :<br>खालील पद्यांश वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा : | |
| | **'माझा मराठीचा बोल'** | |
| (i) | एखादी गोष्ट किंवा प्रसंग आपण पाहतो, ऐकतो किंवा वाचतो तेव्हा त्याचा आपणास अनुभव येत असतो पण तो अनुभव तसा सगळ्यांनाच एकसारख येत असतो. पण मनापासून हृदयापासून एखाद्या गोष्टीत आपण गुंतून जातो तेव्हा त्याच गोष्टीचा येणारा अनुभव, त्याबद्दलची भावना म्हणजे येणारी अनुभूती ! कवीला मायमराठी भाषेविषयी जिव्हाळा आहे. गझल, लोकगीत, अभंग, पोवाडा अशा विविधरंगी काव्यलेखनाने मराठी साहित्य सृष्टीत कवींनी आपले स्थान निर्माण केले आहे. मायमराठी, मराठी माणूस, मराठी माती, मराठी वातावरण, वारकरी पंथ, दिंडी, संतसाहित्य यांच्याशी कवीचे जवळचे नाते आहे. त्यामुळे त्यांच्या कवितेतून मराठीची महती, थोरवी ते गातात.<br>पंढरपूरला चंद्रभागेच्या काठी उभे असलेले विठ्ठलाचे मंदिर आपली कृपेची सावली आहे असे ते मानतात. | |

| | | |
|---|---|---|
| | ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, एकनाथ इत्यादी संतांच्या ओव्यांमधून अमृतासारखी अवीट गोडी अनुभवास येते. वारकरी पंथाची सर्वांना एकजुटीने आपल्यात सामावून घेण्याची, विठ्ठलाच्या भक्तीत रममाण होण्याची मराठी मातीची, मराठी मनाची आठवण होते. मिरवणुक, दिंडी काढताना गुलाल उधळतात. गुलाल हा अभिमानाने मस्तकी धारण करतात. त्या शौर्याला, पराक्रमाला अबीराचा वास आहे असे कवी सांगतात. अबीर म्हणजे पंढरपूरला विठोबाच्या कपाळी लावलेला बुक्का. हा गुलाल, बुक्का, पांढरा अबीर ही मराठी संस्कृती आहे. या सगळ्यांविषयी कवींच्या मनात कळवळा आहे. मनात अपार श्रद्धा, आदर आहे. अशा या मराठी मातीची मनात खोलवर नाळ रुजलेली आहे. मराठी माणसाचा पराक्रम, शौर्य ती एकजुटीची भावना मनात खोलवर जपून ठेवून तोच पराक्रम माझ्या रक्तात आजही सळसळत आहे. आपल्या मायमराठीसाठी आपले मन अर्पण करुन सतत काही कर्य करावे आणि ही मराठीची वंशवेल पुढे पुढे न्यावी, त्याची कीर्ती दशदिशांत पसरवावी अशी अनुभूती कवीने कवितेद्‌वारा व्यक्त केली आहे. | [2] |
| (ii) | कवी अशोक बागवे मराठीचे गौरव गीत गात आहेत. त्यांना मायमराठी भाषेचा अभिमान आहे. ते म्हणतात माझ्या मराठी भाषेचा शब्द, त्या भाषेची जाणीव हृद्‌याच्या तळापासून येते. सर्व लोकांच्या मनात, काळजाच्या खोलवर ही मराठी भाषा रुतून बसलेली आहे, आमच्या काळजात मराठीची स्पंदने आहेत. आकाश जसे अथांग आहे, त्याला अंत नाही. अमृत जसे अवीट आहे तसाच ओलावा, प्रेम, जवळीक माझ्या मराठी भाषेत आहे. आमच्या मराठी भाषेत अवीट अशी गोडी आहे. माझी मराठी ही माझी माउली आहे. ती माझी मायमराठी आहे. माझ्या माय मराठीचे आराध्य दैवत विठाई माऊली आहे. तिच्या प्रेमाची छत्रछाया आम्हांवर आहे. भक्ति मार्गाचा अवलंब करीत मराठी भाषेतून भक्तिची, ज्ञानाची अमृतगंगा सर्वसामान्यां पर्यंत पोचवली. गुलाल हे आनंदाचे, अभिमानाचे प्रतीक आहे. मी मराठीचा गुलाल अभिमानाने धारण करतो. कोणालाही अभिमान वाटावा अशी माझी मराठी भाषा आहे. तिला मस्तकी धारण करावी अशी शिरोधार्य मायमराठी आहे. माझ्या मराठीला अबीराचा सुवास आहे असे कवी म्हणतात कारण मराठी भाषेत प्रेम, दया, माया, ममता, ज्ञान, अभिमान, भक्ती, शक्ती असे सारे गुण सामावलेले आहेत. त्यामुळे मराठीची कीर्ती दशदिशांत पोचली आहे. चंद्रभागा माझ्या हृदयात माझ्या भाषेचा अभिमान, प्रेम भरते. या पिंपळाच्या महान वृक्षाप्रमाणे मराठी भाषा विस्तीर्ण, अनादीकालापासून स्वत:चे अस्तित्व राखून अभिमानाने ताठ उभी आहे. तिची कीर्ती दशदिशांत पसरली आहे. माझ्या मराठी भाषेचा वारसा, अभिमान मी पुढे नेण्याचा वसा घेतला आहे. अशाप्रकारे कवी अशोक बागवे मराठी भाषेविषयीचा अभिमान व्यक्त करतात. | [2] |
| (iii) | आनंदाच्या प्रसंगी गुलालाची उधळण करतात. मस्तकावरही अभिमानाने गुलाल लावतात. गणपती, होळी, मिरवणूक, पालखी अशा शुभप्रसंगी गुलाल उधळतात. म्हणजेच गुलाल हे आनंदाचे, अभिमानाचे प्रतीक आहे.<br>कवी म्हणतो की, मी मराठीचा गुलाल अभिमानाने धारण करतो. कोणालाही अभिमान वाटावा अशी माझी मराठी भाषा आहे. तिला मस्तकी धारण करावी अशी शिरोधार्य मायमराठी आहे.<br>अबीर म्हणजे चंदन, केशर, कापूर, कस्तुरी यांच्या मिश्रणाचा सुगंधी पदार्थ आहे. अर्थात त्याचा सुवास, सुगंध दूरवर दरवळतो. त्याचप्रमाणे माझ्या मराठीला अबीराचा सुवास आहे असे कवी म्हणतात. कारण मराठी भाषेत चंदन, केशर, कापूर, कस्तुरी यांच्याप्रमाणे प्रेम, दया, माया, ममता, ज्ञान, अभिमान, भक्ती, शक्ती असे सारे गुण सामावलेले आहेत. त्यामुळे मराठीची कीर्ती अशीच दशदिशांत पोहोचली आहे. | [3] |
| (iv) | माझी मराठी माझ्या मनात रुतलेली आहे. आमचा धर्म, पंथ, जातही एकमेव मराठी भाषाच आहे. आमच्या मनामनात मराठी दंग झाली आहे. आमच्या नसांमध्ये, आमच्या धमन्यांतील रक्तात मराठी रंगली आहे. अर्थात आमचा श्वास हा मायमराठीसाठी आहे. अशा या मराठी भाषेची नाळ खोलवर रुजलेली आहे. तिचे आणि आमचे अभिन्न असे नाते आहे. आमच्या श्वासात, नसांनसांत, कणाकणात, चराचरात मराठी भरुन राहिलेली | |

आहे. पिंपळ हा विस्तीर्ण वृक्ष आहे. तो अनेक युगे अस्तित्व धरुन राहतो. ताठ, अभिमानाने, ऊन, वारा, पाऊसधारा झेलत उभा राहून फोफावत जातो. त्याची मुळे जमिनीत खोलवर रुतलेली असतात. त्याला उखडून काढणे कठीण आहे. त्याच्या पानांची सळसळ कानाला, मनाला जाणवते. तो महान वृक्ष थंडावा देत राहतो. या पिंपळाच्या महान वृक्षाप्रमाणे मराठी भाषा विस्तीर्ण, अनादीकालापासून स्वत:चे अस्तित्व राखून, अभिमानाने ताठ उभी आहे. तिची कीर्ती दशदिशांत पसरली आहे. मराठी भाषा आता इतकी फोफावली आहे की त्याच्या कीर्तीची सळसळ म्हणजे गौरव आम्हाला दुनियेच्या कानाकोप-यातून ऐकू येते. माझ्याही रक्तात ती सळसळ भिनली आहे. माझ्या मराठी भाषेचा वारसा, अभिमान मी पुढे नेण्याचा वसा घेतला आहे. अशाप्रकारे कवी अशोक बागवे मराठी भाषेविषयीचा अभिमान व्यक्त करतात.

मायमराठीच्या व तिच्या लेकरांच्या पराक्रमाची शौर्याची नाळ म्हणजे तेच गुण माझ्या रक्तात भिनले आहेत. म्हणून त्या पराक्रमाची सळसळ मला रक्तात जाणवते. **[3]**

## रंगस्पर्श

**A.11** Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :

खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा.

**'सकाळचा अभ्यास'**

(i) दामू व दिनू हे दोन भाऊ अभ्यास करत होते. दामू इंग्रजीचे शब्द पाठ करत होता व दिनू खानदेशातील तालुके पाठ करत होता. दोघांच्याही जोरजोरात घोकण्यामुळे भांडण सुरू झाले व अभ्यास बाजूलाच राहिला. काहीवेळाने दोघेही चहा प्यायला आत गेले. तेवढ्यात त्यांचा छोटा भाऊ जगू तेथे आला. जगू दामूच्या रीडरमधील चित्रे आपल्या मित्राला दाखवायची म्हणून रीडर घेऊन गेला. चहा पिऊन आलेल्या दामूला खूप शोधूनही आपले रीडर सापडले नाही, त्यामुळे त्याचे शब्दांचे पाठांतर अडून राहिले. टाईमटेबल रीडरमध्ये होते, त्यामुळे दुसऱ्या दिवशी कोणते तास आहेत हे त्याला समजेना. घरचा अभ्यास काय आहे हे विचारण्यासाठी गणूकडे जावे लागल्यामुळे त्याचा अभ्यासाचा वेळ वाया गेला.

अशाप्रकारे दामूचे रीडर जगूने नेल्यामुळे दामूचा अभ्यास अपूर्ण राहिला. **[2]**

(ii) सकाळच्या वेळी दामू आणि दिनू एकत्र अभ्यास करीत होते. दामू इंग्रजी शब्द व त्यांचे अर्थ पाठ करीत होता. त्याचवेळी दिनू भूगोलाचा अभ्यास करीत होता. दिनू खानदेशातील तालुक्यांची नावे घोकत होता. त्यामुळे दामूला त्रास व्हायला लागला. तेव्हा दामूने त्याच्या श्रीमुखात भडकावून देण्याची धमकी दिली. तेव्हा दिनूने आईजवळ अशी तक्रार केली की, दादा त्याला उगाचच मारत आहे. तसेच दामूचे रीडर मिळत नव्हते. त्याबद्दल दामूने दिनूला विचारले, पण दिनूने नकार देताच दामू त्याच्यावर धावून गेला. त्यावेळी दिनूची पाटी फुटली तेव्हा दादाने पाटी फोडली अशी तक्रार दिनूने केली. रीडर शोधताना पिशवीच्या खेचाखेचीत पिशवीचा बंद तुटला, तेव्हा दादाने पिशवीचा बंद तोडला अशी तक्रार दिनूने आईजवळ केली. ज्याप्रमाणे दिनूने तक्रारी केल्या त्याचप्रमाणे आईजवळ स्वत:च्या बचावासाठी दामूनेही तक्रारी केल्या की मी मारत नाही, दिनूच मोठमोठ्याने ओरडतो आहे आणि अभ्यास करू देत नाही शिवाय रीडरही दिनूने लपविले आहे.

अशाप्रकारे दामू व दिनू परस्परांच्या वरील तक्रारी आईजवळ करीत होते. **[2]**

(iii) सकाळच्या वेळी दिनू व दामू अभ्यासाला बसले होते. दोघांचाही अभ्यास म्हणजे केवळ घोकंपट्टी होती. दामू जोराजोरात इंग्रजीचे शब्द पाठ करत होता, तर दिनू जोराजोरात खानदेशातील तालुके पाठ करत होता. मधूनच दोघे चहा प्यायला आत निघून गेले. तेवढ्यात छोटा जगू येऊन दामूचे रीडर मित्राला दाखवायला म्हणून घेऊन निघून गेला. चहा पिऊन परत आल्यावर दामूचा अभ्यास रीडर नसल्यामुळे अडून राहिला. तो

पाठ करीत असलेला इंग्रजी शब्दच विसरला. नंतर तो भूगोलचा अभ्यास करू लागला. तो केवळ पाठांतरासाठी शहरांची नावे घोकत होता व अधूनमधून दिनूलाही डिवचत होता. त्याचे लक्ष मधूनच दिनूजवळच्या शिटीकडेही गेले. काहीवेळाने तो कुत्र्याच्या ओरडण्याकडे आकर्षित झाला. या सर्व गडबडीत त्याचे पाठांतरही सुरू होते. पण ते लक्ष देऊन न केल्याने तो सुरूवातीला 'आस्कफर्ड' आणि 'केपरीच' तर हळूहळू 'आस्कर' आणि 'खेपरी' असे म्हणू लागला. शेवटी तर 'चास्कर' आणि 'खेपरी' असे चुकीचे घोकू लागला. केवळ घोकंपट्टी केल्यामुळे व पूर्ण एकाग्र चित्ताने अभ्यास न केल्याने त्याचा अभ्यास चुकत गेला.

अशाप्रकारे मनापासून अभ्यास न करता केवळ घोकंपट्टी केल्यामुळे दामूच्या अभ्यासाची गडबड झाली. **[3]**

(iv) सकाळच्या वेळी दामू व दिनू हे दोघे भाऊ अभ्यासाला बसले होते. दामू इंग्रजीतील शब्द पाठ करत होता तर दिनू भूगोलमधील खानदेशातील तालुके पाठ करत होता. दोघेही मोठमोठ्याने घोकत आपला अभ्यास करीत होते. दिनू 'खानदेशातील तालुके - धुळे, अमळनेर, एरंडोल, पाचोरे' असे मोठ्याने म्हणत होता. दामूसुद्धा 'एफ् ए बी एल ई' म्हणजे 'फेबल' असे जोरात घोकत होता. मधेच दामूने दिनूला दम दिला की, हळू घोक नाहीतर श्रीमुखात भडकावून देईन. दिनूने लगेचच त्याची आईकडे तक्रार केली. मधूनच एकमेकांना ते सुचना करत होते. मात्र एकमेकांशी स्पर्धा करत जोरात घोकल्यामुळे दोघांनाही त्रासच होत होता. पण त्याची पर्वा न करता दोघेही आपापला अभ्यास करीत होते.

अशाप्रकारे दामू व दिनू इंग्रजी व भूगोल या विषयांचा चढाओढीत अभ्यास करत होते. **[3]**

**A.12** Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :

खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा.

**'अबोल झाली सतार'**

(i) वसंत हा एल.आय.सी. मध्ये काम करीत असतो. 'ग्राहकांचा फायदा हीच आमची जबाबदारी' हे एल.आय.सी.चे ब्रीद वाक्य असल्यामुळे तो नेहमी दुसऱ्यांचा फायदा शोधत असतो. पण त्याचे हेच धोरण तो आपल्या बहिणीच्या संसारात लागू करण्याचा प्रयत्न करतो. त्याची बहिण सविता एका कलंदर सतारवादक रमेशशी लग्न करते. सविता ही ग्रॅज्युएट मुलगी आहे आणि रमेश एक सतार वादक कलावंत आहे. वसंतच्या मते सतार वादकाला जास्त काम मिळत नाही. त्याच्या कलेला काहीही महत्त्व नाही. त्यापेक्षा सविताने दुसऱ्या कोणत्या शिकलेल्या व्यक्तीशी विवाह केला असता तर तिचे भले झाले असते, असा तो विचार करतो. त्यातच एके दिवशी रमेशचा अचानक अपघात होतो. त्याचे दोन्ही ही हात निकामी होतात. ही बातमी वसंतला समजते तो त्याला पाहण्यासाठी हॉस्पिटलमध्ये येतो त्याची अवस्था पाहून म्हणतो, आता तर हा आयुष्यात काहीही करू शकत नाही.

त्यावेळी तो रमेशचा निष्काळजीपणा स्पष्ट करतो की या कलावंताने स्वत:चा विमादेखील काढला नाही आणि सविताला सांगतो की आता जे तुझ्या आयुष्यात झालं ते विसर आणि पुन्हा माहेरी चल. या माणसाबरोबर राहून तुझा काहीही फायदा नाही. म्हणजेच वसंतला सविताच्या प्रेमाची कदर नाही. त्याने या ठिकाणी आपला व्यवहार मांडला. वसंत हा त्याच्या एल.आय.सी.च्या कामाच्या बाबतीत व्यवहारी आहे पण माणुसकी, नातेसंबंध याबाबतीत व्यवहारी नसावा असे वाटते. **[2]**

(ii) बापूसाहेब हे सविताचे वडील आहेत. त्यांचे खरे नाव व्ही.एल. इंदूरकर आहे. प्लास्टिक सर्जरीचे स्पेशॅलिस्ट म्हणून प्रसिद्ध सर्जन अशी त्यांची ओळख आहे. दोन वर्षांपूर्वी सविताने रमेश नावाच्या सतारवादक कलावंताशी विवाह करण्याचे ठरविले. त्या विवाहाला बापूसाहेबांचा सुद्धा विरोध होता. त्यामुळे ते सविताशी सर्व संबंध

तोडतात. त्यातच रमेशचा अपघात होतो. डॉ.कापडिया त्याचे दोन्ही हात निकामी झाल्याचे सांगतात. त्यासाठी ऑपरेशन करणे गरजेचे आहे व ते ऑपरेशन करण्यासाठी मुंबईहून खास बापूसाहेब येणार असे सांगतात. ते ऐकल्यावर तिला जास्तच भिती वाटते. कारण तिने केलेल्या चुकीचा, अपमानाचा बदला आता बापूसाहेब ऑपरेशन करताना घेणार. रमेशचे जीवन संपविणार व आपल्याला पुन्हा माहेरी घेऊन जाणार, असे तिला वाटते. म्हणूनच या सर्व कारणांमुळे तिचा आपल्या वडिलांवर म्हणजेच बापूसाहेबांवर विश्वास नव्हता. [2]

(iii) डॉ.कापडिया हे एक प्रसिद्ध अस्थितज्ज्ञ (Orthopaedic) आहेत. त्यांचे स्वतःचे एक मोठे हॉस्पिटल आहे. ते गुजराती असल्यामुळे मराठी बोलत असताना गुजराती शब्द बऱ्याच वेळा बोलण्यात वापरले जातात. बोलण्यात रोखठोक असलेले डॉ.कापडिया मनाने अतिशय हळवे आहेत. गरीब आणि अनाथ पण कलावंत असलेल्या रमेशवर त्यांचा खूप जीव आहे. त्याचे सतारवादन त्यांना खूप आवडते. जेव्हा रमेशचा अपघात होतो आणि त्याच्या दोन्ही हातांच्या हाडांचा चूरा होतो तेव्हा त्यांना खूप वाईट वाटते. परंतु तसे न दाखवता ऑपरेशनची तयारी करतात आणि रमेशच्या पत्नीला म्हणजे सविताला खूप धीर देतात. याशिवाय त्यांना कामामध्ये अडथळा आणून बातम्या गोळा करायला येणाऱ्या वर्तमानपत्रांच्या पत्रकारांचा खूप राग येतो.

अशाप्रकारे डॉ.कापडिया यांचे प्रेमळ व्यक्तिमत्त्व लेखकाने रंगविले आहे. [3]

(iv) वसंत हा सविताचा मोठा भाऊ आहे. तो एल.आय.सी. मध्ये काम करीत असतो. एल.आय.सी.च्या ब्रीदवाक्याप्रमाणे योगक्षेम वहाम्यहम् (तुमचा फायदा हीच माझी जबाबदारी) सविताला समजून सांगण्यासाठी येतो. सविता ही एका सतारवादक रमेशशी प्रेमविवाह करते. या प्रेमविवाहाला वसंत व संपूर्ण कुटुंबाचा विरोध असतो तरीही ती रमेशशी विवाह करते. त्यांचा संसार सुरू असताना एके दिवशी अचानक रमेशचा अपघात होतो व त्या अपघातात रमेशचे दोन्ही हात निकामी होतात. हात निकामी झाल्यामुळे सतार वाजविणे रमेशला जमणार नाही. शेवटी रमेश व सविता दोघांवर उपासमारीची वेळ येईल. सविताला अनेक संकटांना सामोरे जावे लागेल असे वसंतला वाटते. सविता ग्रॅज्युएट मुलगी आहे. तिला कोणताही चांगला मुलगा मिळू शकेल व ती जीवनात खूप सुखी होईल. म्हणून वसंत सविताला 'परत घरी चल', असे म्हणतो. [3]

**A.13** Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :

खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा.

**'विठ्ठल तो आला'**

(i) समाजातील खोटेपणा, स्वार्थीपणा तसेच ढोंगीपणाचे लेखकाने वर्णन केले आहे. लेखक म्हणतात, प्रत्यक्ष देव आला तरी देवाला वेड लागेल अशी आजकाल परिस्थिती निर्माण झाली आहे. भक्तीचा बाजार मांडताना स्वतःला भक्त म्हणवणाऱ्या लोकांचे देवाकडे लक्षच नसते. त्यावेळी आंधळ्याच्या व्यक्तिरेखेतून लेखक भक्तांचा दांभिकपणा उघड करतो. सर्व भक्तगण आपल्याच विश्वात रममाण होतात आणि खऱ्या विठ्ठलावर अविश्वास दाखवतात. प्रत्यक्ष विठ्ठल समोर असूनही विठ्ठलाच्या खरेपणाचा पुरावा मागतात. स्वतःच्या व्यवसायातील अडचणी सांगतात. पण अंध असूनही विठ्ठलावर माया करणाऱ्या, परिस्थितीचा सकारात्मक विचार करणाऱ्या आंधळ्याला विठ्ठल दिसतो, खऱ्या अर्थाने कळतो पण डोळसांना मात्र समोर प्रत्यक्ष उभा असूनही विठ्ठल कळत नाही. ते सारे स्वार्थाने आंधळे झालेले असतात.

अंतःकरणापासून भक्ती केली, कुठलीही अपेक्षा न करता साद घातली तर परमेश्वर आपल्यासमोर उभा राहतो. प्रामाणिकपणे आपले कर्तव्य केले तर परमेश्वराची आपल्याला संगत लाभते हेच लेखक येथे सांगतात. [2]

(ii) कित्येक युगे एकाच विटेवर उभे राहून लोकांची चिंता वाहण्याचे काम करून विठ्ठल कंटाळलेले आहेत. मलाही आता नुसते उभे न राहता कष्टाची भाकरी खायची आहे, असे ते म्हणतात. मी घोडे धुऊ शकतो, दळण दळू शकतो. कबिराचे शेले विणू शकतो, तसेच मला विणकाम येते, सरंजामकार्यालयात काम करण्यास मला कोणीही घेईल. मला मास्तरही होता येईल, दुकानात मी काम करू शकतो.

| | | |
|---|---|---|
| | अशाप्रकारे नुसते उभे राहण्यापेक्षा कष्टाची भाकरी खाण्यासाठी वरील वेगवेगळी कामे करण्याची इच्छा विठ्ठल व्यक्त करतात. | [2] |
| (iii) | खोट्या भक्तांना व देवपणाला कंटाळलेले विठ्ठल मास्तर होण्याची इच्छा व्यक्त करतात. त्यावेळी मास्तर झाले की वह्या तपासाव्या लागतात, इन्स्पेक्टरचा जाच होतो. पोरांचा त्रास, पोरांना मारता येत नाही, विडीचे बंडल आणताना पोरं बंडलातल्या चार चार विड्या गायब करतात. मुलांना शिक्षा केली तर एक मोर्चा घरावर व दुसरा शाळेवर येतो. श्रीमंतांची पोरं शिकवण्यांच्या धास्तीने तर गरिबांची पोरे बोर्डाच्या चेअरमनच्या धास्तीने नापास करता येत नाहीत. शाळेत पोरांचा तर गावात गुंडांचा त्रास होत असतो. पांडवा चिरपुट्याच्या गांजेकस बापाची गौतम बुद्धांप्रमाणे पुण्यतिथी साजरी करावी लागते. 'चिरपुटे जिंदाबाद' म्हणून ओरडावे लागते. शिवाय जपानी भातशेतीची कलमे वाटावी लागतात, तसेच रस्ते झाडायच्या सप्ताहाला झाडू तर वन महोत्सवाला झाड लावा. ही सर्व कार्य करावी लागतात. या सर्व कामात खूप त्रास होतो. गुरं ऐकतात पण पोरं ऐकत नाहीत.<br>वरील सर्व त्रासामुळेच 'मास्तर नका होऊ', असे मास्तर विठ्ठलाला म्हणतात. | [3] |
| (iv) | डॉक्टर 'पशू डॉक्टर' म्हणजे गुरांचे डॉक्टर असतात. ते म्हणतात, शेतकरी खूप शहाणे असतात. ते आमची परीक्षा बघण्यास धडधाकट गुरांना घेऊन येतात. ही धडधाकट गुरे जरा चुकले की, लाथ मारतात. नंतर वरिष्ठ चुकी झाली म्हणून बदली करतात. दहा वर्षांच्या सर्व्हिसमध्ये त्यांच्या बेचाळीस बदल्या झाल्या. तसेच गुरांची प्रदर्शने भरवावी लागतात. सोबत वरिष्ठांची निगा ठेवावी लागते. सालटेवाडीला गुरांच्या प्रदर्शनात उद्घाटन करणाऱ्या पुढाऱ्याला पहिल्या नंबरच्या बैलाने शिंग मारले त्यामुळे डॉक्टरांचा इन्क्रिमेंट स्टॉप झाला.<br>वरील कारणांसाठी डॉक्टर विठ्ठलाला 'पशू डॉक्टर होऊ नका', असे सांगतात. | [3] |
| | **करुणाष्टक** | |
| **A.14** | Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :<br>खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा.<br>**प्रकरण - ३** | |
| (i) | एके दिवशी लेखकाचे शेजारी विठू काका सरपणाची खोली उघडून आत गेले, तर दारातच त्यांना तोंड वासलेले व पाय आखडलेले दोन उंदीर उताणे मरून पडलेले दिसले. प्लेग आता उंबऱ्याशी आला, या विचाराने आई खूप खचली. विठूकाका त्याच दिवशी घर सोडून गेले. लगोलग गोळीणबाई व तांबे मास्तरांच्या आजाराची बातमी आली. तेव्हा आपल्या कुटुंबाच्या काळजीने आई हवालदिल झाली. | [2] |
| (ii) | गावात प्लेगची साथ पसरल्यावर गावातील माणसे रानामळ्यात जाऊन राहू लागली. लेखकाच्या आईलाही आपल्या मुलांची काळजी वाटू लागली. तेव्हा मावशीच्या शेतावरचा गडी निरोप घेऊन आला. मावशीने सामानसुमान आवरायला सांगितले होते. ती सकाळी बैलगाडी पाठवणार होती. मावशीने लेखकाच्या आईला आंब्याच्या झाडाखाली आपल्या यजमानांना सांगून गडी माणसाकडून झोपडी बांधून दिली. प्लेगच्या भीतीने घाबरलेल्या आईला मावशीने तिच्या मळ्यात आसरा दिला. | [2] |
| (iii) | लेखकाचे वडील कामासाठी राजधानीच्या गावी जाऊन दीड महिना उलटला होता. त्या दरम्यान आईने फार हलाखी सोसली होती. त्याकाळात उधारपाधार, उसनवार घेऊन आईने घर चालवले. एके दिवशी ओढ्यापलीकडच्या मठातला गोसावी भिक्षा मागायला आला. तेव्हा घरात काहीही नव्हते. आपल्या भुकेलेल्या मुलांसाठी तिने गोसाव्याकडे दहा घरी भीक मागून आणलेलं पीठ मागितलं. गोसाव्याने पीठ आणून दिले. तेव्हा आईने गोसाव्याला आश्वासन दिले की, याचे पैसे मी तुला देईन. तिची मुले मोठी झाल्यावर त्याचे हे उपकार | |

| | | |
|---|---|---|
| | फेडतील. तेव्हा गोसावी आईला म्हणाला, अशी खोटी आशा बाळगू नको. तेव्हा लेखकाची आई गोसाव्याला म्हणाली की, माझे कष्ट वाया जाणार नाहीत. आपल्या उज्ज्वल भविष्याची तिला आशा होती व विश्वासही होता. | **[3]** |
| (iv) | प्लेगनंतर कचेऱ्या सुरू झाल्या ; पण शाळा सुरू झाल्या नव्हत्या. त्यामुळे मुलांचा दिवसभर रानावनात भटकण्यात वेळ मजेत जात होता. पिंपळाच्या झाडावर घारीच्या घरट्यात काय आहे ? हे पाहण्याची मुलांमध्ये पैज लागली. घरटं उंचावर होतं. लेखकाच्या अंगात वीरश्री संचारली. पैजेची चार मोरपिसे मिळविण्यासाठी तो झाडावर चढला ; पण अर्ध्यावर जाऊन त्याचे बळ संपले. नाना हातात ओले चिपाड घेऊन ओरडत आले. तेव्हा सगळी मुले पळाली. नानांनी गड्याला सांगून लेखकाला खाली उतरवले. वडील घरी नसताना लेखकाने हे काम केल्याने नानांनी शिव्या हासडून दोन चिपाड लेखकाच्या अंगावर ओढली. | **[3]** |
| **A.15** | Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :<br>खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा.<br>**प्रकरण - ७** | |
| (i) | बारीकराव सुमारे पाच-सहा वर्षे ‘शेती’ या विषयाच्या मागे लागला होता. पहिली गोष्ट त्याने केली ती म्हणजे जिराईत रानात त्याने विहीर काढली. अतोनात श्रम आणि पैसा लागला पण त्याने ती इर्ष्येने पूर्ण केली. मोट, नाडा, बैलगोठा, गडी, दावण सगळं झालं आणि मळा पिकू लागला. पाणी पुरेसं नव्हतं, पण जेवढं होतं त्यावर ऊस, पेरूची बाग, भाजीपाला सगळं करून झालं.<br>अशाप्रकारे बारीकरावाने शेतीत सुधारणा केल्या. | **[2]** |
| (ii) | लेखकाच्या आईचे माहेरचे घर छान चिरेबंदी होते. आईवडिलांचे घर आणि बालपण तिथे गेल्यामुळे आईलाही ते फार प्रिय होते. लेखकाच्या आईला भाऊ नव्हता. नाहीतर हा बालगीतातल्या मामाचा वाडा शोभला असता. रुंद असे अंगण होते, भागलेल्या चांदोबाला लपायला निंबोणीचे झाडसुद्धा होते. आईची चांगली पिकणारी बागाईत, जिराईत अशी अठरा एकर जमीन ह्या गावी होती. त्यामुळे मामाच्या वाड्यात जाऊन, तूपरोटी खाऊन यायला कुणालाही आडकाठी नव्हती. | **[2]** |
| (iii) | लेखकाचा भाऊ प्राथमिक शाळेत शिक्षक झाला. रोज पायपीट करून सात मैलांवर असलेल्या गळवेवाडी ह्या खेड्यात जाऊन झोपडीतल्या शाळेत मुलांना शिकवू लागला. पण लवकरच तो पायपिटीला, एकाकी राहणीला कंटाळला. स्वत:च शिजवून खायला कंटाळला. शिक्षण संचालकांकडे जाऊन बदलीस विचारपूस केली. त्यांनी ट्रेंड शिक्षकाचा ट्रेनिंग कोर्स करण्यास सांगितले. त्यानंतरच बदली शक्य होती. लेखकाचा भाऊ ‘हो’ म्हणाला पण प्रश्न आर्थिक होता. ट्रेनिंग कोर्स केला नाही, तर नोकरीत पुढे जाता येणार नव्हते. आईने जमीन गहाण टाकण्याचा सल्ला दिला पण कर्ज काढलं की ते वारणं होत नाही. व्याज, चक्रवाढ व्याज चढत राहतं आणि सावकार जमीन गिळून बसतो. जमीन विकली की खायचं काय ? अशा अनेक प्रश्नांनी लेखकाचा भाऊ निराश झाला. | **[3]** |
| (iv) | लेखकाचा भाऊ बारीकराव ‘काय करू, कसं करू’ असा अष्टाक्षरी मंत्र जपत होता. कारण त्याने एका परगावच्या व्यापाऱ्याला अर्ध्यात घेऊन, काळीकरंद अशी दहा एकर जमीन खरेदी केली आणि तिच्यात भलीमोठी बाव खोदण्याचा घाट घातला. सुरुवात केली, खोदाईला गडी लागले. खाणीकडे दगड पाडायला वडार लोकांना कंत्राट दिलं. बेलदाराची गाढवं मागवली. रात्रंदिवस रानात आणि घरात खोदकाम आणि बांधकाम सुरू झाले आणि ऐन मध्यावर येऊन पैश्यांअभावी काम थांबलं आणि त्यामुळे लेखकाचा भाऊ बारीकराव अस्वस्थ झाला. आता हा प्रश्न प्रतिष्ठेचा होऊन बसल्यामुळे तो अष्टाक्षरी मंत्र जपत होता. | **[3]** |

**A.16** Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :

खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :

**प्रकरण - ११**

(i) लेखक व ड्रायव्हर दुपारी तीन वाजता निघालेले असतील. सातारा ते खानापूर येईपर्यंत अंधार झालेला होता. जागोजागी रस्त्याची कामे काढलेली होती. तसेच रस्ता ड्रायव्हरच्या परिचयाचा नसल्यामुळे तो जरा बिचकत गाडी चालवत होता. लेखक जेव्हा आईच्या अंतिम दर्शनासाठी गावी पोहोचला तेव्हा रात्रीचे दहा वाजून गेलेले होते. लेखक पोहोचेपर्यंत सगळे विधी उरकलेले होते. एवढ्या तातडीने निघून तसेच एवढ्या लांबचा प्रवास करूनही लेखकास त्याच्या आईचे अंतिम दर्शन घेता आले नाही, या विचाराने टॅक्सीचा ड्रायव्हर हळहळला. **[2]**

(ii) सुट्टीचा दिवस असल्यामुळे लेखक ऑफिसला गेला नव्हता. तो घरीच होता. दोनच्या सुमारास त्याला फोन आला. कसलीशी अर्जन्ट तार ऑफिसच्या पत्त्यावर आली होती. ड्युटी ऑफिसरने 'मदर एक्सपायर्ड टुडे' हा मजकूर फोनवर वाचून दाखविला. त्याने तातडीने फोन केला होता. परंतु आवराआवर करून निघेपर्यंत तीन वाजले होते. सातारा ते खानापूर येईपर्यंत अंधार झाला होता. टॅक्सी ड्रायव्हरला रस्ता परिचयाचा नव्हता. दुष्काळी काम म्हणून रस्त्याचे काम चालू होते. जागोजागी खडी पसरली होती. मुलूख ओसाड होता म्हणून ड्रायव्हर बिचकत गाडी चालवत होता. अशा परिस्थितीत लेखक गावात येऊन पोहोचला तेव्हा रात्रीचे दहा वाजून गेले होते. लोभाच्या माणसांना वाट पाहत थांबावं लागू नये म्हणून सगळं उरकून घेतलं होतं. म्हणूनच लेखकाला आईचे शेवटचे दर्शन झाले नाही. **[2]**

(iii) आई गेल्यावर तिसऱ्या दिवशी लेखक व त्यांच्या भाऊबंदापैकी पुष्कळ जण राख सावडण्यासाठी वाळूच्या पात्रात बसले. लेखक उकिडवा बसून राख सावडू लागला. एक बोटाएवढा अस्थीचा तुकडा लेखकाच्या हाती आला. त्या अस्थिच्या तुकड्याभोवती तांबड्या काचेचं कडं होतं. त्यावरून लेखकाने ते आईचं मनगट असावं हे ओळखलं आणि आगीच्या आचेनं एवढीशी राहिलेली बांगडी देखील ही ओळखली. राख, एवढासा अस्थ्यवशेष आणि काचेची बांगडी, या गोष्टी आईची राख सावडताना लेखकाला मिळाल्या. **[3]**

(iv) आई गेली की, माणसाचे बरेच काही जाते. सर्वांना बांधून ठेवणारा धागाच जणू सुटून जातो. लेखकाला त्याच्या आईचे अंतिम दर्शनही घेता आले नाही याबद्दल वाईट वाटते. माणसाविषयीची करूणा निसर्गालाही होत असावी याची जाणीव होत राहते. आईची राख सावडताना फक्त बोटाएवढा अस्थीचा तुकडा सापडणे व त्यावरून तो आईचा कोणता अवशेष असेल हे मुलाने ओळखणे, आई आणि मुलाची अशी भेट हृदयाची अगतिकता दर्शवते. **[3]**

❖❖❖❖